N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी  **P.S.(ठाणे):** गंगाखेड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0789  **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/12/2024 17:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 04/12/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/12/2024
**Time From (वेळेपासून):** 17:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/12/2024  **Time (वेळ):** 16:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/12/2024 16:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखे,गंगाखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सुरेंद्र बळीराम मुंढे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेलमोहा ता गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेलमोहा ता गंगाखेड,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9545657878

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रकाश विठल टाक | | | 1. दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखे,गंगाखेड,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 18/12/2024
फिर्याद
मी सुरेंद्र बळीराम मुंढे, वय 42 वर्ष, धंदा वकील व शेती रा. शेलमोहा ता. गंगाखेड जि. परभणी मो.नं. 9545657878, 8975387777.

समक्ष पोलीस ठाणे गंगाखेड येथे हजर येवुन लेखी फिर्याद देतो कि, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन श्रीमती मिरा सुरेश चव्हाण यांचा गंगाखेड नगर परिषद हद्दीतील गट नं. 423 मधील 93 चौ. मिटरचा प्लॉट नं. 130 हा खरेदी करण्यासाठी किती फिस लागते हे विचारण्यासाठी मी दि. 03/12/2024 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखेड येथे गेलो होतो. तिथे हजर असणारे प्रभारी दुय्यम निबंधक टाक हे माझे कडील प्लॉट नं. 130 चे पेपर पाहुन आणि त्याचे व्हॅल्युवेशन करून म्हणाले की, शासनाचे चालान हे 6 ते 7 हजार रुपयाचे लागेल आणि वरुन देण्यासाठी त्यांनी त्याचे समोरील कॅलक्युलेटरवर दहाचा अंक टाईप करुन दहा हजार रु. लागतील असे सांगुन लाचेची मागणी करीत असुन दि. 04/12/2024 रोजी माझ्या कामा संबंधाने त्यांना भेटण्यासाठी जाणार असल्याची दि. 03/12/2024 रोजी ए.सी.बी. परभणी येथे तक्रार दिली होती.

माझे तक्रारीवरुन पोलीस उप अधीक्षक श्री अशोक इप्पर ए.सी.बी. परभणी यांनी दि. 04/12/2024 रोजी आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, पाथरी यांना पत्र देवुन त्यांचे विभागातील 1) श्री विजय नानाभाऊ गालफाडे, वाहक बि. नं. 26395 व 2) श्री सोमेश्वर रामदास सुरवसे, चालक बि. नं. 19745 यांना शासकीय पंच म्हणुन उपलब्ध करून घेतले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री अशोक इप्पर एसीबी, परभणी हे खाजगी वाहनाने दोन्ही पंच व सापळा पथकासह गंगाखेड येथे आले. तेथे माझी ओळख पंच व सापळा पथकासोबत करुन देवुन माझे तक्रारीबाबत सविस्तर सांगुन एसीबी कार्यालयातील सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर माझे तक्रारीवरुन लोकसेवक दुय्यम निबंधक टाक यांचेवर लाचमागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. सुरुवातीस पोशि/अतुल कदम यांनी खाजगी वाहनात मला व पंचांना DVR बाबत माहिती देवुन आमचे वक्तव्य रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्हाला लाचमागणी पडताळणी कार्यवाही अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. लाचमागणी पडताळणी कार्यवाहीकरीता पोशि/अतुल कदम यांनी माझेकडे DVR चालु करुन देवुन मला व पंच क्र 1 गालफाडे यांना माझेकडील मोटारसायकलने दुय्यम निबंधक, गंगाखेड कार्यालयात पाठविण्यात आले. सदर लाचमागणी पडताळणी कार्यवाहीदरम्यान मी खरेदी करणार असलेल्या प्लॉट करीता लागणा-या शासकीय फिस बाबत चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक दुय्यम निबंधक टाक यांनी मुद्रांक शुल्क 6600/-रु. व नोंदणी 1100/-रु. असे एकुण 7700/- रुपयाचे चालन लागत असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा त्यांनी कॅलक्युलेटरवर टाईप करून 5,000/- रु. लाचेची पंच क्र 1 गालफाडे यांचे समक्ष लाचमागणी केली. त्यावेळी मी त्यांना रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी त्यांनी पुन्हा कॅलक्युलेटरवर टाईप करून तडजोड अंती 4,000/- रु. पंच क्र 1 गालफाडे यांचे समक्ष लाचेची मागणी केली. त्यानंतर खरेदी खताची फाईल दुय्यम निबंधक कार्यालयात ऑनलाईन नोंद केल्यानंतर दुय्यम निबंधक प्रकाश टाक यांचेवर सापळा कार्यवाही करण्याची पंचासमक्ष विनंती केली. सदरची लाचमागणी पडताळणी कार्यवाही दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखेड येथे 17.24 ते 17.49 पावेतो केली आहे. मी दि. 05/12/2024 रोजी ऑनलाईन दस्तनोंद दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखेड इथे जावुन केली आहे. त्यानंतर सदर दस्त नोंदणी करण्यासाठी तिन महिन्याचा कालावधी मिळत असतो.

दि. 10/12/2024 रोजी परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यासमोरील सविधांनाची विटंबना झाल्याचे कारणावरुन परभणी जिल्हयात तणावपुर्ण वातावरण असल्याने ठिकठिकाणी जाळपोळ व तोडफोड असल्याने वाहने बंद असल्याने पुढील कार्यवाही करीता विलंब झाला. त्यानंतर दि. 17/12/2024 रोजी परभणी

जिल्हयातील वातावरण शांत झाल्याने मी दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखेड इथे जावुन माझे दस्ताची शासकीय फिस 7,700 रूपये एच.डी.एफ.सी. बँक खात्यातुन भरून त्याची पावती घेतली आहे. त्यामुळे माझे विनंती वरुन संपुर्ण सापळा पथक व दोन्ही पंच सापळा कार्यवाही करीता गंगाखेड येथे आले. परंतु लोकसेवक टाक हे कार्यालयात हजर नसल्यामुळे माझे विनंती वरुन सापळा कार्यवाही दि. 18/12/2024 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.
दि. 18/12/2024 रोजी सापळा कार्यवाही करीता सापळा पथक दोन्ही पंचासह गंगाखेड शहरातील सरकारी दवाखान्याच्या शवविच्छेदन विभागासमोर आले व पोलीस उप अधिक्षक इप्पर साहेबांनी बोलावुन घेतले. सदर ठिकाणी शासकीय वाहनात सापळा पुर्व कार्यवाहीला सुरूवात झाली. लोकसेवक दुय्यम निबंधक प्रकाश टाक यांनी दि. 04/12/2024 रोजी मला पंचासमक्ष कॅलक्युलेटरवर टाईप करून तडजोडअंती 4,000/- रु. लाचेची मागणी केली होती. त्यामुळे मी 500/- रु. दराच्या 8 भारतीय चलनी नोटा एकुण 4,000/- रु. दोन्ही पंचासमक्ष हजर केल्या. सदरच्या नोटांचे नंबर पंच क्र 2 सुरवसे यांनी त्यांचे हस्ताक्षरात को-या कागदावर लिहल्या. सदरचा कागद पंच क्र 2 याचेकडे ठेवण्यात आला. त्यानंतर पोशि/जिब्राईल यांनी मला व दोन्ही पंचांना अल्ट्राव्हायलेट लॅम्प व अॅंथ्रासिन पावडरबाबत माहिती दिली. त्यावरुन अॅंथ्रासिन पावडर हे नैसर्गिक प्रकाशात दिसत नसुन अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात हिरवट चकाकी दिसुन येत असल्याचे समजले. पंचांनी माझी अंगझडती घेतल्यानंतर पोशि/जिब्राईल यांनी मी सादर केलेल्या 4,000/- रु. ज्यात 500/- रु. दराच्या 8 भारतीय चलनी नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावुन माझे शर्टचे समोरील डाव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवल्या. त्यानंतर लोकसेवक दुय्यम निबंधक प्रकाश टाक यांची भेट घेवुन सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कार्यवाहीसाठी पोलीस उप अधीक्षक इप्पर साहेब यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पोशि/अतुल कदम यांनी माझेकडे 13ः23 वाजता DVR चालु करुन माझे गळयात लटकावुन देवुन पाठविण्यात आले. सापळा पथक हे शासकीय वाहनाने माझे पाठोपाठ निघाले. मी गंगाखेड शहरातील दुय्यम निबंधक कार्यालय परिसरात मोटार सायकल लावली. त्यामुळे सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजुस थांबले. मी व पंच क्र. 01 गालफाडे असे दुय्यम निबंधक कार्यालयाच्या आत मध्ये लोकसेवक दुय्यम निबंधक प्रकाश टाक यांची भेट घेण्यासाठी गेलो. त्यावेळी लोकसेवक टाक हे कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मी तेथे हजर असलेल्या प्रभारी दुय्यम निबंधक मुंढे यांना भेटलो. त्यांना लोकसेवक टाक यांचे बाबत विचारपुस केली असता त्यांनी ते सुट्टीवर असल्याचे व त्यांचा चार्ज माझेकडे असल्याचे सांगीतले. त्यानंतर आमच्यामध्ये प्लॉट खरेदीच्या नोंदणी बाबत चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी तुमचे काम होवुन जाईल थोडयावेळ थांबा असे सांगीतले. तसेच दि. 04/12/2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान टाक यांनी त्यांचे कार्यालयातील कर्मचारी कनव यांचे समक्ष कॅलक्युलेटर वर टाईप करून लाचेची मागणी केली होती. त्यामुळे लोकसेवक टाक यांनी मागीतलेले 4000/- रूपये रक्कम मी घेवुन आलो असे म्हणुन कनव यांचे समोर रक्कम ठेवली. त्यावेळी कर्मचारी कनव यांनी मला सांगीतले की, त्यांनी मागीतलेली रक्कम त्यांच्याकडेच द्या असे म्हणुन लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून लोकसेवक टाक यांना माझा संशय आल्याने ते सुट्टीवर निघुन गेले आहेत. ते माझेकडुन यापुढे लाच स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली. त्यानंतर मी कार्यालया बाहेर येवुन सापळा पथकास हाताचा ईशारा करून स्वतःजवळ बोलावुन घेतले. त्यावेळी पोशि/कदम यांनी माझे कडील DVR स्वतःकडे घेवुन 13.38 वाजता बंद केला. त्यानंतर मी पोलीस उप अधिक्षक इप्पर साहेब यांना दोन्ही पंचासमक्ष घडलेली घटनेची माहिती दिली. त्यांनतर सापळा पथक माझेसोबत दुय्यम निबंधक कार्यालयात जावुन पुढील कार्यवाही केली.
दि. 04/12/2024 रोजी 17.24 ते 17.49 दरम्यान दुय्यम निबंधक कार्यालय, गंगाखेड येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक प्रकाश टाक यांनी पंच क्र 1 गालफाडे यांचे समक्ष मी खरेदी करणार असलेल्या प्लॉट करीता लागणा-या शासकीय फिस व्यतीरिक्त कॅलक्युलेटरवर टाईप करून तडजोड अंती 4,000/- रु. लाचेची मागणी केली. म्हणुन माझी प्रकाश विठल टाक, पद- दुय्यम निबंधक - श्रेणी 01, गंगाखेड रा. लोकमान्य नगर, परभणी यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

DeepakKumar Chudaman Waghmare(I (Inspector)) / POBN72857 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S.P. Mundhe

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DeepakKumar Chud
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72857

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन
(PSI ...)
मो. 9011118878